# मातृत्व

मातृत्व
क्षणाक्षणाला आई सय तुझी येते
आसव डोळ्यात अन् घुसमट जीवाची होते

न कळे जीवाचे हाल का गं होते
तुझ्या नुसत्या जाणिवेने मन शहारून येते

तुझ्या मायेचा ओलावा तुझा गं तो जिव्हाळा
भूतकाळातील आठवणींना उजाळा देते

तुझ्या उबेचा तो पदर तुझ्या हाताची ती गोडी
आता नुसती आठवण रुपी विरते

तुझ्या दुधाची गं गोडी तुझे ते मातृत्व
आज मजला आई झाल्यावर कळते...

प्रतिक्षा...